# उषा मेहता यांना ताराराणी पुरस्कार जाहीर

कोल्हापूर, ता. ४ : येथील ताराराणी विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या भद्रकाली ताराराणी पुरस्कारासाठी मुंबईच्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. उषा मेहता यांची निवड करण्यात आली आहे.

ताराराणी विद्यापीठातर्फे भद्रकाली ताराराणी हा द्वैवार्षिक पुरस्कार सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक किंवा सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भारतीय महिलेला देण्यात येतो. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक



उषा मेहता

डॉ. व्ही. टी. पाटील यांनी हा पुरस्कार देण्यास व त्या निमित्ताने कर्तबगार भारतीय स्त्रीचा गौरव करण्यास सुरुवात केली. यापूर्वी हा पुरस्कार श्रीमती विजयाराजे शिंदे, डॉ. सरोजिनी बाबर, मेधा पाटकर यांना देण्यात आला आहे. १९९७-९८ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाचे असल्याने ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ. उषा मेहता यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक गोविंदभाई श्रॉफ यांच्या हस्ते १८ डिसेंबरला दुपारी चार वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात पुरस्कार प्रदान समारंभ होईल. २१ हजार रुपये, महाराणी